
अनुवाद
हेमलता होनवाड
धोका
शाळा!

- कॉन्व्हेंट आणि नवोदय विद्यालयांच्या प्रसाराने शिक्षणाचा दर्जा सुधारेल का?
- समाजातील इतर व्यवस्थांपासून पूर्णपणे वेगळं असं शाळेकडे पाहता येतं का?
- गरीब, कष्टकऱ्यांची मुलं चांगलं शिक्षण केव्हा आणि कसं घेऊ शकतील?
- सध्याचं शालेय शिक्षण सामाजिक परिवर्तनाचं साधन होऊ शकेल का?

धोका : शाळा!

मराठी अनुवाद : **हेमलता होनवाड**

मनोविकास प्रकाशन

धोका : शाळा!

मराठी अनुवाद : हेमलता होनवाड

Danger : School!

Marathi Anuvad : Hemlata Honwad

© मराठी प्रकाशनाचे हक्क मनोविकास प्रकाशनाकडे

संपादन : अरविंद गुप्ता

प्रकाशक । अरविंद घन:श्याम पाटकर,
मनोविकास प्रकाशन,
फ्लॅट नं. ३ ए, ४ था मजला,
शक्ती टॉवर्स, ६७२, नारायण पेठ,
पुणे - ४११ ०३०.
पुणे फोन : ०२०-६५२६२९५०
मुंबई फोन : ०२२-६४५०३२५३
Email : manovikaspublication@gmail.com

ISBN : 978-93-80264-02-8

मुखपृष्ठ । गिरीश सहस्रबुद्धे

अक्षरजुळणी । गणराज कॉम्प्युटर्स, पुणे.


मुद्रक । श्री बालाजी एंटरप्रायझेस, पुणे.

प्रथमावृत्ती । १५ फेब्रुवारी २०१०


मूल्य । ७० रुपये

शुभ मुहूर्त पाहून बेंडबाजाच्या गजरात एका दिवशी...

विद्यामंदिर, पाली



मंत्री व अधिकाऱ्यांच्या
उपस्थितीत



एका मोठ्या वसाहतीत एका 'नवोदय' शाळेचं

(अशी शाळा तर गावात २१व्या शतकातसुद्धा मिळणार नाही.)



उद्‌घाटन होतं...




सगळीकडे आंनदीआंनद होतो.

...आणि तरीही



वातावरणात अस्वस्थता जाणवते आहे.

काही विद्यार्थी कंटाळले आहेत.




अस्वस्थता पण आहे...



माझ्यापेक्षा जास्त मार्क्स मिळवणारा माझ्या प्रगतीच्या मार्गावरील अडथळाच ठरू शकतो; म्हणून दुसऱ्यांना कमी मार्क्स मिळाले की मला आनंदच होतो!

काही विद्यार्थी इतके अस्वस्थ होतात, की आजारी पडतात.



शाळेच्या पहिल्याच दिवशी बाईंनी सांगितलं, की आमच्यापैकी एक-तृतियांश परीक्षेत नापास होतील. ''आकडेवारीने हे सिद्ध झालं आहे'' असं त्या म्हणाल्या.

शाळा ही अशी संस्था आहे, की जी मानसिक ताणामुळे अस्वस्थ होणाऱ्या विद्यार्थ्यांना आजारपण बहाल करते. लेखी व तोंडी परीक्षा, शिक्षकांकडून शिस्त पालनाचा अवास्तव आग्रह किंवा धमक्या, स्वच्छ हवा आणि शारीरिक शिक्षणाचा अभाव, आई-वडिलांच्या अपेक्षा, काही विद्यार्थ्यांच्या मनात अधिक मार्क मिळविण्याबद्दलची काळजी आणि त्यावर नोकरीचा प्रश्न, या सर्वांमुळे जो मानसिक ताण येतो त्यामुळे शेवटी विद्यार्थी नेहमीच 'चिंताग्रस्त' असण्याच्या मनोविकाराला बळी पडतात. याचा परिणाम शरीराच्या अंतर्गत व्यवस्थेवरही होतो. डोकेदुखी, पचनक्रियेत अडथळा, हृदयाची धडधड आणि त्वचेचे रोग यासारखे आजार विद्यार्थ्यांना बेजार करतात; पण उन्हाळा किंवा दसरा-दिवाळीच्या सुट्ट्या लागल्या की ही आजारपणं छू-मंतर होतात.

आणि कितीतरी विद्यार्थी तर शाळेतून पळून जायच्या विचारात असतात...
आणि पळून जातातही!

पालकांपुढील पेच



"संपन्न वर्गातील लोकच तर बनवतात
सगळ्या योजना आणि कार्यक्रम...!"

"माझं म्हणणं आहे, की सहजप्रवृत्तीच्या विरुद्ध काम होऊच शकत नाही. माझी मुलगी खूप बडबड करते हे मला मान्य आहे; पण जर दमदाटीनं तिला गप्प करून रात्रंदिवस जरी तिच्याकडून काम करून घेतलं, तरी ती यशस्वी होऊ शकणार नाही. कोणावर दबाव आणून आपण त्यांच्याकडून काम करवून नाही घेऊ शकत."





मुलांचे निकाल वाईट लागण्याच्या भीतीनं
पालकांना नेहमीच ग्रासलेलं असतं.
आपण मुलांकडे नीट लक्ष देऊ शकत नाही
या भावनेनं त्यांच्या मनात घर केलेलं असतं.

...शिक्षकांमध्ये अस्वस्थता

काही संतुष्ट आहेत...



काही चिंतीत आहेत...




आज आपण पडक्या इमारतींमध्ये वर्ग-खोल्यांच्या चार भिंतींमध्ये राहून सीमित विचारात अडकून पडलो आहोत. या भिंतींबाहेरील समाज मात्र अत्यंत वेगाने बदलतो आहे. आपण त्याच जुन्या-पुराण्या मळलेल्या वाटेनं चालत आहोत, जी फार पूर्वी उपयोगी होती व आता कालबाह्य झाली आहे. समाज ज्या झपाट्याने बदलतो आहे आणि त्या बदलामुळे समाजाच्या ज्या गरजा निर्माण होताहेत, त्या गरजा पूर्ण करण्याच्या हेतूने जोपर्यंत शिक्षणाच्या स्वरूपात आपण त्याच वेगाने बदल घडवून आणत नाही, तोपर्यंत या शिक्षणाचा काय उपयोग? केवळ दोन-चार 'साहेब' फक्त निर्माण होतील! जेव्हा आपण 'समाजा'चा उल्लेख करतो, तेव्हा हे लक्षात ठेवायला हवं, की आपण एका विशिष्ट 'धनिक' वर्गाबद्दल बोलत नाही, तर कष्ट करणाऱ्या समाजाबद्दल बोलतो आहोत!

काहींना वाटतं की दोष त्यांच्याच आहे...



गोंधळून गेले आहेत...



ओरडताहेत...




जे काही बदलवण्याचा
प्रयत्न करतात;
त्यांच्या मार्गात सर्व प्रकारचे
अडथळे येतात.

हे काहींच्या सहनशक्तीच्या
बाहेर चाललंय.



काही सहकाऱ्यांकडून विरोध,
काही प्रशासकांकडून तर काही
पालकांकडून विरोध...



कितीतरी मुलं शाळा सोडून देतात...




शिक्षण पद्धती म्हणजे एक चाळणी आहे. श्रीमंतांची मुलंच पुढे जातात...

भारतातील प्रत्येक १०० मुलांमधून



४०-५० शाळेत जाऊच शकत नाहीत.


५०-६० मुलं प्राथमिक शाळेत दाखल होतात. त्यातील ३०-४० शाळा सोडून देतात.





२०-२५ माध्यमिक शाळेत जातात; त्यातील १०-१५ शाळा सोडून देतात.


५-१० उच्च माध्यमिक शाळेत जातात. त्यातील ४-६ शाळा सोडून देतात.





फक्त १-२ मुलंच कॉलेजपर्यंत पोहोचतात.


अशा प्रकारे अधिकांश समाजासाठी शाळा काहीच कामाची नसते.


मग या आशा-आकांक्षा... हे उच्च हेतू...
उत्तम उद्दिष्टं... महान गोष्टी...
तुम्ही तर आकडेवारी पाहिलीतच...
या सगळ्याचा परिणाम हाच का?... अपयश, निराशा, अस्वस्थता आणि मानसिक कटुता?
पण असं का?
ही शाळा आली तरी कुठून? का सुरुवातीपासून हे असंच चालत आलंय?
नाही

बिनभिंतीचं शिक्षण...

शाळा नावाची कुठलीही गोष्ट अस्तित्वात नसलेले समाज पूर्वीही अस्तित्वात होते आणि आताही आहेत.


अशा समूहातील लोक कामासाठी अवजारं तयार करायचे. त्याचबरोबर जीवनातील मूल्ये, परस्परांशी वागण्याच्या रिती-भाती हळूहळू विकसित होत जात. म्हणजेच त्या वेळचं शिक्षण हे नैसर्गिक व सामाजिक पर्यावरणातून निर्माण होत गेलं.



प्रत्येक प्रौढ व्यक्ती 'शिक्षक'च असायची. छोटे आणि मोठेही लोकांच्या अनुभवातून शिकत जायचे.

ते प्रत्यक्ष करून शिकायचे.
ज्ञान, कष्ट व जीवनाची
तेव्हा फारकत झालेली नव्हती.

तिथे कोणी शाळारूपी वेगळा ज्ञानाचा वृक्ष
नव्हता, तर जीवनरूपी वृक्षाच्या फांद्यांवर ज्ञान
उमलत, फुलत असे.



अशा समूहांना आजकाल 'मागासलेले' आणि
'आदिवासी' असं म्हटलं जातं.
अशा समाजात रोजचे साधे साधे व्यवहार,
शेती, अनुभवी, वयस्कर माणसांच्या गप्पा-गोष्टी,
वेगवेगळ्या सण-उत्सवात भाग घेणं ह्याच
पद्धतींनी आपलं आपणच शिकायची रीत आहे.

'सभ्य' शाळा

मध्ययुगात युरोपमध्ये झालेल्या घडामोडींमुळे 'शिक्षण' हे शालेय व्यवस्थापनाचं 'उत्पादन' बनलं.

ज्याप्रमाणे आपल्या देशात समाजातील एक वर्ग - ब्राह्मण वर्ग, प्राचीन काळी ज्ञानाचं भांडार मानला जात होता, त्याप्रमाणेच युरोपमधील समाजातही एक 'शिकविणारा' वर्ग उभा राहिला. या वर्गात जास्त करून 'पाद्री' होते. हे लोक 'ज्ञान' एका आभासात्मक वातावरणात पसरवण्यात तरबेज झाले. हे वातावरण रोजचं जीवन आणि प्रौढांपासून दूर गेलं. हीच 'शाळा' या व्यवस्थेची सुरुवात होती. जसजशी वर्षांमागून वर्षे गेली तसतशा या शाळा उच्चभ्रूंसाठी राखीव होत गेल्या. बाकीची माणसं शेतकरी, मजूर किंवा इतर कामकरी- आपआपल्या जीवन-संघर्षातूनच शिकत राहिली.

'सभ्य' लोकांच्या या शाळांमध्ये जुन्या परंपरा आणि नैतिक मूल्यांवर खूपच भर दिला जात असे. काही प्रमाणात बोलण्यातील कौशल्य आणि तत्त्वज्ञानावरपण भर दिला जात असे. वैज्ञानिक दृष्टिकोन (जाणीव), ज्यामुळे परिवर्तन होण्याची शक्यता होती, हा भाषणबाजी आणि लॅटिन भाषेपेक्षा कमी महत्त्वाचा होता. शेवटी याच दोन गोष्टी त्या परंपरेच्या प्रतीक होत्या, जिच्यामध्ये जग आणि जगातील समाज यांना अपरिवर्तनीय मानलं जात असे.

या 'सभ्य' वर्गांसाठी लिहिणं-वाचणं हे आपली तथाकथित 'सभ्यता' कायम ठेवण्यासाठी आवश्यक असं हत्यार बनलं.





सन १८०२ मध्ये डेस्टूट डी ट्रेसी नावाच्या एका साहेबांनी शिक्षणाच्या या वाटणीवर एक नोट (टिपण) लिहिली होती. ती नोट वाचताना असं वाटतं, की जणू ती आमच्या आजच्या शिक्षण पद्धतीची भविष्यवाणी होती.

श्रीमान डेस्टूट यांनी लिहिलं :

"कोणत्याही सभ्य समाजात हे अपरिहार्य/अनिवार्य आहे, की लोकांचे दोन वर्ग असावे. एक वर्ग कष्ट करून आपलं जीवन व्यतीत करणाऱ्यांचा आणि दुसरा त्यांचा, जे संपत्ती किंवा बुद्धीच्या श्रमांनी आवक उत्पन्न करतात. पहिल्याला आपण श्रमिक वर्ग म्हणू आणि दुसऱ्याला शिक्षित वर्ग म्हणूया."

"श्रमिकांना लवकरात लवकर आपल्या मुलांच्या श्रमांची गरज पडते. त्यामुळे या मुलांना लहान वयातच कठीण परिश्रमांची कामं शिकणं आवश्यक आहे आणि हेच त्यांच्या नशिबात आहे. याच कारणामुळे जास्त काळ शाळेत राहणं त्यांच्यासाठी व्यर्थ आहे..."

"पण 'शिक्षित' वर्गातील मुलं आरामात लेखन-वाचनाला वेळ देऊ शकतात, कारण त्यांच्या नशिबात जे आहे ते मिळविण्यासाठी त्यांना उच्च शिक्षणाची गरज असते. त्यांना असं ज्ञान मिळविणं आवश्यक आहे, जे केवळ एका विकसित बुद्धिलाच मिळविणं शक्य आहे..."

"या सगळ्या अशा गोष्टी आहेत, ज्या मानवाच्या हातात नाहीत. या तर मानव व समाजाच्या मूळ प्रकृतीतच अंतर्भूत आहेत- त्या कोणीही बदलू शकत नाही- आपल्याला या अटळ गोष्टी लक्षात घेऊनच विचार करायला हवा..."

"या सगळ्याचा विचार करून आपण हाच निष्कर्ष काढायला पाहिजे, की कोणत्याही राष्ट्रात जर शिक्षणाचा योग्य दृष्टिकोनातून विचार करायचा असेल तर दोन अगदी संपूर्णपणे वेगळ्या शिक्षणव्यवस्था असणं आवश्यक आहे, ज्यांचा एकमेकांशी काहीही संबंध नसेल."

एक शाळा श्रीमंतांची



सभ्य शाळा, जोपर्यंत 'जहागिरदारी'ची प्रथा समाजात चालली, तोपर्यंत चालू राहिल्या; पण पूंजीवादी समाज अस्तित्वात आल्यानंतर बदल होणं अनिवार्य होतं, कारण पूंजीवादाचा पाया शेती नव्हती, तर कारखाने होते.

मशिनीकरणाने तर जगाचा चेहरामोहराचा बदलून टाकला. नव्या तंत्रज्ञानाबरोबरच नवीन सामाजिक वर्गही अस्तित्वात येऊ लागले. जुन्या जमीनदारांशिवाय एका नव्या मध्यम वर्गाने समाजात पाय रोवण्यास सुरुवात केली आणि नवीन उत्पादन केंद्रांच्या म्हणजे उद्याच्या कारखान्याच्या भोवती गरीब कामगार व मजूर गोळा होत गेले.

या बदलत्या समाजातही शाळा ही उच्च वर्गाच्याच आवाक्यात राहिली; पण नवीन अर्थव्यवस्थेला आता विज्ञान आणि टेक्नॉलॉजीची गरज भासली आणि म्हणून शाळेत शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमात बदल झाले आणि शाळेला आधुनिक होणं भाग पडलं. विज्ञान आणि टेक्नॉलॉजी हे विषयही परंपरागत

आणि एक गरीबांची

विषयांइतकेच, म्हणजे लॅटिन, फिलॉसॉफीइतकेच महत्त्वाचे मानले जाऊ लागले.

मध्यम वर्ग, जो समाजात एक महत्त्वपूर्ण शक्तीच्या रूपात विकसित झाला होता, तो काळजी करू लागला, की हजारो, लाखो, 'अडाणी' मजूर सुद्धा कमीत कमी शिक्षण घेऊन शिस्तबद्ध कामगार आणि उत्तम नागरिक बनले पाहिजेत.


अशा रीतीने हळूहळू धनिकांच्या शाळेबरोबर आणखी एका शाळेने जन्म घेतला- गरीबांची शाळा. या शाळेचा हेतू असा होता, की उद्याच्या कामगारांनी थोडं 'सभ्य' बनावं, म्हणजे औद्योगिक समाजाच्या जिन्याच्या पहिल्या पायरीवर उभे राहण्यालायक ते होतील.

ही दुसरी शिक्षणपद्धती एका दुसऱ्या समाजाचं प्रतिबिंब (आरसा) बनून पुढे आलं. कामगारांची मुलं 'प्राथमिक शाळेत' जायला लागली. या शाळांमध्ये एक निश्चित होतं- काही वर्षच शिक्षण होईल, दीर्घ काळ नाही. उच्च वर्गातील मुलांचा मार्ग वेगळा होता आणि त्यांच्या भविष्याची जबाबदारी त्यांच्याच वर्गाच्या खांद्यावर होती.









कंबर मोडेपर्यंत कामाच्या यंत्राच्या पद्धतीत
अडकलेल्या आणि पूंजीवादाने हैराण झालेल्या
कष्टकऱ्यांमध्ये हळूहळू आपल्या हक्कांसाठी
संघर्ष करण्याची क्षमता वाढत गेली.

प्रजातांत्रिक शाळेच्या दिशेने...

'शिक्षण आणि संस्कृतीमध्ये भागीदारी' - एका मुख्य मागणीच्या स्वरूपात पुढे आली. सगळ्यांना शाळेत जायला मिळायला हवं, हा अधिकार मिळाला पाहिजे. मोफत आणि आवश्यक शिक्षणाला प्रजातांत्रिक शिक्षणपद्धतीची किल्ली मानलं गेलं. मजूर आणि कामगारांची अशी आशा होती, की एक अशी 'शिक्षणपद्धती' यावी, जी लोकसेवेच्या स्वरूपात सर्वांना उपलब्ध होईल. ती त्यांना समाजाच्या भेदाभेदाच्या जंजाळातून मुक्त करण्याचे साधन बनेल.

सरतेशेवटी या मागण्या युरोपीय देशांमध्ये मान्य केल्या गेल्या. मुलांच्या शालेय शिक्षणाचा कालावधी वाढविला गेला. शाळेतून बाहेर पडण्याचं वय फ्रान्समध्ये १३ वर्ष आणि इंग्लंडमध्ये १६ वर्ष करण्यात आलं. प्रथम फक्त प्राथमिक शिक्षणच मोफत होतं - हळूहळू वरच्या स्तरांवरील शिक्षणही मोफत उपलब्ध केलं जाऊ लागलं.

जर सर्वांची सुरुवात एकसारख्या शाळेतून झाली आणि सर्वांसाठी एकसारख्या सुविधा असल्या, उदा. मोफत व आवश्यक शिक्षण, तर सर्वात 'चांगल्या', 'प्रतिभावान' व 'योग्य' मुलाला नक्कीच यश मिळेल, ती समाजाच्या कोणत्याही स्तरात जन्मली असली तरी!

अशा तऱ्हेनं दोन स्तरांवरील शिक्षणाचा अंत झाला. सर्व वर्गातील मुलांच्या शिक्षणाची सुरुवात आता एकाच प्रकारच्या शाळेमध्ये होऊ लागली. या शाळेतील शिक्षण संपल्यानंतर पुढच्या शिक्षणासाठी दोन मार्ग होते - एक उच्च शिक्षणाचा आणि दुसरा तंत्रशिक्षणाचा. या मार्गावर जाणं क्षमतेवर अवलंबून होतं. यशस्वी मुलांना लांबच्या रस्त्यावरून जाण्याचा अधिकार मिळायचा (म्हणजे विश्वविद्यालय वगैरे) आणि बाकीच्यांना नोकरी-व्यवसायाच्या शिक्षणाचा.

याचा अर्थ असा झाला, की निवड पहिल्यांदा जन्म किंवा संपत्तीवर अवलंबून असायची, ती आता शालेय शिक्षणानं ठरू लागली. असं वाटायला लागलं, की आता निवड अधिक न्याय्य पद्धतीने होते आहे.

शिक्षणाला प्रजातांत्रिक बनविण्याचा दीर्घ संघर्ष यशस्वी झाला आहे असं मानता येईल का?

जर शिक्षणाला प्रजातांत्रिक बनविण्याचा अर्थ असा असेल, की दर वर्षी मागच्या वर्षीपेक्षा काही अधिक मुलं शाळेत दाखल होताहेत किंवा काही अधिक डिग्ऱ्या दिल्या जाताहेत, तर हो! काही प्रमाणात शिक्षण लोकतांत्रिक झालं आहे.

पण जर शिक्षणाला प्रजातांत्रिक बनविण्याचा अर्थ असा असेल, की समाजाच्या सर्व स्तरातील मुलांना समान संधी आणि सोयी मिळाव्या, तर नाही! अजून संघर्ष यशस्वी झाला नाही.

शिक्षणाची शर्यत




वास्तव काय आहे?

कष्टकऱ्यांच्या मुलांसाठी शिक्षणाची काही दारं तर उघडली आहेत,
पण या मुलांच्या यशाची शक्यता इतर स्तरातील मुलांच्या मानाने बरीच कमी आहे.


सामाजिक असमानता जिथे होती तिथेच आहे.

१. नापास होणे, मागे पडणे



प्राथमिक स्तरावर, इतर वर्गांच्या तुलनेत कष्टकऱ्यांची मुलं अधिक प्रमाणात नापास होतात.


२. निवड पद्धती




शिक्षणाच्या विविध क्षेत्रांमध्ये जाण्याची शक्यता मुलांच्या सामाजिक पार्श्वभूमीवर निगडीत असते.




३. शाळा सोडणे



आता तर हा विचार दृढ झाला आहे, की अभ्यासात मागे पडणं हे शाळा सोडण्याचं प्रमुख कारण आहे आणि ह्याला बळी पडतात अर्थातच जास्त करून गरीब घरातील मुलं. युनेस्कोच्या एका सर्वेक्षणाने या गोष्टीला पुष्टी मिळते.



बाप
तसा
बेटा



सर्वसाधारणपणे मुलं ज्या वर्गात जन्म घेतात, त्याच वर्गाच्या व्यवसायात पडतात. ही गोष्ट विशेष करून समाजाच्या सर्वोच्च व त्याहून थोड्या खालच्या स्तरावरील मुलांच्या बाबतीत जास्त लागू होते.

उच्च वर्गातील जवळजवळ ४२% मुलं आपल्या वडीलांप्रमाणेच व्यवसाय किंवा मोठ्या पदावरील नोकरी करतात.

या शिडीवरील दुसऱ्या टप्प्यावरील मजुरांची ६४% मुलं मजुरीच करतात. आणि जिथे शेतकऱ्यांचा प्रश्न आहे, तिथे त्या वर्गातील ३९% मुलं शेतीच करतात आणि ३५% मुलं कारखान्यात कामाला लागतात.


1
सर्वसाधारणपणे शाळेतील प्रगतीवरूनच तुमचा व्यवसायही ठरतो.
मग काय?
2
अशा रीतीने तुमचं समाजातील स्थानसुद्धा शाळेतील निकालावरूनच नक्की होतं.
यापेक्षा जास्त लोकतांत्रिक असं काय असणार?
3
नाही रे बाबा! याचा स्पष्ट अर्थ असा आहे, की शाळा पूर्वीच्याच स्थितीला अजूनही घट्ट धरून आहे.
4
तुम्ही स्वत:च पाहिलंत. मजुरांची मुलं अजूनही मजूरच बनतात.
हो बहुतेक... आणि उच्च स्तरातील मुलांना उच्च श्रेणीतील नोकऱ्या मिळतात - हे तर साहजिक आहे.
5
'साहजिक आहे' म्हणजे तुम्हाला म्हणायचंय तरी काय?
अरे भल्या माणसा! एक तर मुलं हुशार असतात नाहीतर नसतात. उच्च वर्गातील मुलं आपल्या आई-वडिलांसारखीच हुशार असतात, हे अगदी सरळ आहे.
6
आणि मग तुम्ही म्हणाल की मजुरांची मुलं बुद्धू असतात.
एवढं तर नक्कीच म्हणू शकतो, की आपल्या आई-वडिलांसारखे ते सुद्धा 'बुद्धिमान' नसतात.

7


बुद्धिमत्ता तर काही सर्वांना
एकसारखी वाटून दिलेली नसते.
त्याबद्दल कोणीही काहीच करू शकत
नाही - न शाळा, न समाज!

8


हे साफ
चूक आहे!

9


या अपयशाची
कारणं दुसरीकडे
शोधायला हवीत.
दुसरीकडे?
म्हणजे कुठे?

10



शालेय व्यवस्थेच्या
छुप्या व्यवहारात!
छुप्या? म्हणजे
काय म्हणायचंय
काय तुम्हाला?


11


काही शिक्षकांच्या अगणित प्रयत्नानंतरही
हे लक्षात घेणं आवश्यक आहे, की
शालेय व्यवस्थेत असं काही तरी आहे
ज्यायोगे काही मुलं खूप प्रगती करतात,
पण खूपशी मुलं मागेच राहतात.


12


शिक्षण देणारं हे मशीन अशा तऱ्हेनं बनलं आहे,
की ते शिक्षकाच्या मुलाला पुढे ढकलेल,
पण मजुराच्या मुलाला मागे ओढेल.
तुम्हाला हे सिद्ध
करून दाखवावं
लागेल.



ठीक आहे! तर
मग या मशीनच्या प्रत्येक भागाची
अगदी बारकाईने पाहणी करणं
आवश्यक आहे.
एक वेगळं जग
विशेष चालरीती
बंद आणि सुरक्षित जग
जीवनापासून वेगळा
निरुपयोगी विषय
माध्यमांनी चालविलेली
धाड-धाड्यांनी
भरलेला रस्ता


अरे सोड!
हे तर आधीपासूनच
बिघडलेलं आहे.
आपण ते पूर्ण उघडून
बघायला हवं,
की काय बिघडलंय.
अरे बाबा!
हे मशीन तर
व्यवस्थित चाललेलं दिसतंय.
त्याला आपण हात
न लावलेलाच बरा.
उगीच घोटाळा
व्हायचा काहीतरी.

एक वेगळंच जग




... जिथे मुलाचं
पार्सल आणून पोहोचवलं जातं...





... वाट्टेल त्याला इथे प्रवेश मिळत नाही
आणि पालकांनाही तिथे अलिप्तच ठेवलं जातं!



'जगण्या'पासून तोडून टाकलं जातं...





9
10
१८ वर्षांखालील
व्यक्तींना प्रवेश नाही
11
12
13
14
15
विद्यालय
BAH!


16
17
18
स्वप्नं बघताय काय राजे?
?!
19
20
BLA BLA BLA
उत्तर दे ना!
21
तोंड बंद!
22
BLA BLA BLA BLA BLA BLA
23
BLA BLA BLA BLA BLA BLA BLA BLA BLA
RING!

जिथे पुतळ्यासारखे बसा आणि गप्प राहा

सहा वर्षांच्या वयातच मुलांना एका ओळीत एका जमिनीवर बसवलं जातं किंवा लाकडाच्या कडक बाकांवर शिस्तीत बसून राहण्याचा आदेश दिला जातो. त्यांना सांगितलं जातं - हलू नका, डुलू नका, इकडे-तिकडे पाहू नका, मागेपण वळू नका. मग तासन्‌तास त्यांना चित्रविचित्र शब्द ऐकवले जातात. ऐकवणारा एक जण जातो तर दुसरा येतो. या चैतन्य आणि जिज्ञासेने ठासून भरलेल्या बंडलांना आपण धाकधपटशा दाखवून तासन्‌तास न हालचाल करता चार भिंतींमध्ये बंद करून ठेवतो, याला काय आपण निव्वळ योगायोग म्हणणार? बाहेर मात्र मोकळ्या हवेत, सूर्याच्या प्रकाशात आणि उबेत जीवन बहरत असतं. पाणी पिण्यासाठी आणि शू किंवा शी लागली तर सहा तासात फक्त काही मिनिटांची सुट्टी असते आणि ती पण एका ठरावीक वेळी!
जीवनाचा नाश करण्याचा यापेक्षा अधिक चांगला उपाय कोणता असू शकेल? या व्यवस्थेमुळे मांस, पेशी, इंद्रिये, शरीरांतर्गत अवयव, मेंदू आणि त्यातील




पेशी दमून जातात. खरं तर, शिक्षकांच्या भाषणापेक्षाही जर अधिक अहित कशानं होत असेल तर ते या बैठकीच्या पद्धतीनं! आज हे मान्य झालं आहे, की सलग अशा पद्धतीने बसल्यामुळे शरीराच्या शिरा वगैरेंना त्रास होतो आणि २०% पेक्षा अधिक मुलांचा मणक्याचा कणा तिरका होतो. जवळ जवळ शंभर वर्षं झाली (अशा तऱ्हेच्या शाळा सुरू होऊन) मुलं याच स्थितीत अस्वस्थपणे पाय हलवत बसतात, हात इकडे-तिकडे हलवतात आणि घंटा वाजल्यावर बंदुकीतून सुटलेल्या गोळीसारखी सुसाट पळत सुटतात. या अस्वस्थतेला 'बेशिस्त' असं नाव दिलं आहे आणि हे कधी समजून घेतलं जात नाही, की ही अस्वस्थता हा बंधनांचा परिणाम आहे - बंधनं जी मुलांवर लादली गेली आहेत. नाही - हा काही निव्वळ योगायोग नाही. हे सगळं तर जाणून-बुजून केलं जातं. हे बदलायला हवं आहे, तोडायला हवं आहे.

जिथे नियम आधीपासूनच ठरवलेले असतात...




एका चौदा वर्षाच्या मुलाला त्याच्या घरी विचारणा झाली,
"तोंडी परीक्षेसाठी शाळेमध्ये आतापर्यंत काय आणि कसं शिकवलं?"
त्याने उत्तर दिलं, "आम्हांला गप्प बसायला शिकवलं जातं."

नवीन प्रशिक्षित शिक्षकांना विचारलं,
"चांगल्या विद्यार्थ्यांची लक्षणं कोणती?"
४१% नी सांगितलं, "मन लावून ऐकणं, शिस्तीत वागणं आणि आज्ञाधारकपणा."
२% नी उत्तर दिलं, "तर्कशुद्ध विचार आणि समज."



विद्यार्थी गप्प बसतात, ऐकतात आणि दिलेल्या सूचनांचं पालन करतात.

शिक्षकच
बोलतात,
त्यांनाच
माहिती असतं,
तेच आदेश देतात,
ठरवतात,
निर्णय करतात,
आणि
शिक्षा देतात.



सगळ्यात गमतीची बाब ही आहे, की अशा तऱ्हेचं शिक्षक आणि विद्यार्थ्यांचं वागणं हे योग्य आणि सहज मानलं जातं. वर्गात काय घडायला हवं हे ठरविण्याचा अधिकार विद्यार्थ्याला नाही. शिक्षक त्याच्याबद्दल जे म्हणतात तसंच विद्यार्थी स्वत:ला समजतो. उदाहरण म्हणून दहा वर्षांच्या काही मुलांनी स्वत:बद्दल अशी उत्तरे दिली :

पहिला विद्यार्थी

- तू एक चांगला विद्यार्थी आहेस का?
- फार चांगला नाही.
- तुला कसं माहीत?
- माझ्या शाळेचा रिपोर्ट... त्यामध्ये लिहिलं आहे, की मी दंगा करतो, इतर विद्यार्थ्यां-
 बरोबर मिळून-मिसळून वागत नाही... कितीतरी वेळा हे माझ्याबद्दल लिहिलं गेलं आहे.

दुसरा विद्यार्थी

तू चांगलं काम करतोस?


- हो. खूपच चांगलं.
- हे तुला कसं माहीत?
- जेव्हा माझे शिक्षक माझी वही तपासतात तेव्हा 'छान', 'खूपच छान' असं लिहितात.

तिसरी विद्यार्थिनी

- तू चांगलं काम करतेस का?
- माहीत नाही... हो!
- तुला कसं माहीत?
- चांगले गुण मिळविण्याचा मी प्रयत्न करत असते.

जिथे फक्त सुंदर भाषाच सभ्यतेचं लक्षण आहे.






सुरुवातीच्या वर्षांत मुलांना जी भाषा शिकवतात, ती ना त्यांची असते, ना त्यांच्या आई-बापांची. बोलीभाषा आणि ही शाळेतली भाषा, यामध्ये जेव्हा जेव्हा फरक दिसून येतो, तेव्हा त्याची नोंद घेतली जाते, दुरुस्ती केली जाते आणि शिक्षक या चुकीबद्दल शिक्षाही देतात. या सगळ्याचा हेतू असा असतो, की हळूहळू मूल शाळेची भाषा शिकेल.

पण याचा परिणाम मात्र उलटा होतो. शिक्षक रागावतील व मारतील या भीतीने कितीतरी मुलं गप्प राहणंच अधिक श्रेयस्कर समजतात. लेखन पण नेमकं तेवढंच करतात जेवढं आवश्यक आहे, ज्यातून कमीत कमी यातना होतील. भाषातज्ज्ञ आणि मानसशास्त्रज्ञ, दोघंही अशा शिकविण्याच्या पद्धतींवर टीकास्त्र सोडतात, ज्यामुळे आपली स्वाभाविक शैली हिरावून घेतल्याची भावना मुलांच्या मनात दृढ होत जाते. अशा तऱ्हेने 'मान्य' भाषेहून वेगळी असलेली मुलांची भाषा नष्ट केली तर हे नक्की होतं, की पुढे आयुष्यभर त्याला कधीही योग्य तऱ्हेने अभिव्यक्ती करता येणार नाही. आणि तरीसुद्धा ही मुलं तरुण झाल्यावर त्यांच्या क्षीण अभिव्यक्तीचं लोकांना आश्चर्य वाटतंच. या प्रकारची हानी खूपच गंभीर आहे, कारण याचा परिणाम केवळ अभिव्यक्तीपाशीच थांबत नाही. कोणत्याही समूहाची भाषा ही त्याच्या संस्कृतीचा अतिशय महत्त्वाचा भाग असते आणि त्या भाषेला चुकीची किंवा मागासलेली ठरवणं म्हणजे त्या संपूर्ण समुदायाची ओळख आणि संस्कृती यांना धिक्कारणं ठरतं.


खिसे दाखव!
आणखी... आणखी
आतून दाखव!
?!!!
?!!
??!!!
काहीतरी लपवतो
आहेस तू!
हं! हं!
या सगळ्यांना बाहेर
काढणं आवश्यक आहे!
स्वप्न
भावना
इच्छा
राजनीती
कुतूहल
बालपण
वासना
पुढे जाण्याची
तळमळ
स्वत:चे अनुभव


...एक वाट काट्यांची

शाळेतील परीक्षा तर बंदच करायला हव्यात; पण जोपर्यंत आपल्याला हे करणं शक्य होत नाही तोपर्यंत या परीक्षा अधिक न्याय्य तर बनवायलाच पाहिजेत. कठीण प्रश्नांचा स्तर हा जीवनाशी निगडीत असलेल्या इतर अडचणींपेक्षा अधिक उंचावर असण्यात काही अर्थ नाही. परीक्षा अधिक अवघड बनवणं हा एकप्रकारचा, मुलांना अडकवण्याचा, रोगच होऊन जातो - जसं काही मुलांबरोबर युद्धच सुरू करायचंय.



एकापाठोपाठ एक परीक्षा


तोंडी परीक्षा आणि लेखी गृहपाठ सलग एकापाठोपाठ एक घेतल्या आणि दिले जातात. खूप मुलांसाठी हे एक ताण आणि चिंतेचं कारण बनतं; आणि हा ताण आणि चिंता वाढविण्यात आई-वडिलांचापण वाटा असतो, कारण या परीक्षांच्या निकालाप्रमाणे ते मुलांना बक्षीस किंवा शिक्षा देत असतात.



वर्षाच्या शेवटी चाळणी

ज्ञान आणि विज्ञानाचं दरवर्षी रेशनप्रमाणे वाटप करण्याची एक पद्धत अमलात आणली गेली. प्रत्येक स्तरावर गिळण्यासाठी या रेशनचा एक डोस निश्चित केला आहे. या गोष्टीचा विचारही न करता, की प्रत्येकजण सारख्या गतीने शिकत नाही!

फक्त तेच, ज्यांनी ज्ञानाच्या या वार्षिक रेशनचा घोट व्यवस्थित गिळला आहे, पुढच्या पायरीवर जाऊ शकतात.




बाकी जे राहतात...

त्यांना पुन्हा परीक्षेवर परीक्षा


द्याव्या लागणार, जोपर्यंत ते शाळेत असतील तोपर्यंत!

आणि शेवटी जेव्हा शाळा सोडण्याचं वय होतं, तेव्हा जे सलग नापास होत राहिले आणि अभ्यासात मागे राहिले त्यांच्यावर रिजेक्टचा शिक्का मारला जातो आणि हा शिक्काच त्यांचं पूर्ण भविष्य निश्चित करतो.




लिखित रूपातील गोष्टी नीट वाचता न येणं आणि त्यामुळे न समजणं हेच आजपर्यंत अपयशाच्या कारणांपैकी प्रमुख कारण म्हणून समोर आलं आहे.

मुलाच्या संपूर्ण शालेय जीवनावर या गोष्टीचा परिणाम होतो. यश आणि अपयश याचा निर्णयही मोठ्या प्रमाणात फक्त याच गोष्टीवर अवलंबून असतो, मुलाच्या शहाणपणावर नाही.



वर्गात शिकविणाऱ्या शिक्षकांचा एक सर्व्हे घेतला तेव्हा असं आढळलं, की सहाव्या इयत्तेत गेल्यावरच मुलांची चाळणी (निवड) सुरू होते. जे अभ्यासात चांगले असतात त्यांना घरी अभ्यास करण्यासाठी आणि प्रोजेक्टवर काम करण्यासाठी प्रोत्साहन दिलं जातं. म्हणजे, अशा मुलांना शाळेतील पाठ्यपुस्तकांव्यतिरिक्त आणखीही काही वाचण्यासाठी प्रवृत्त केलं जातं. या मुलांना 'चांगली' मुलं म्हटलं जातं. ती परीक्षेतही चांगल्या तऱ्हेनं उत्तीर्ण होतात. यावरून आपण अशी व्याख्या करू शकतो, की 'जी घरी स्वत:च काम करू शकते अशी स्वतंत्र विद्यार्थिनी म्हणजे चांगली विद्यार्थी'; पण असा गट संपूर्ण वर्गाच्या केवळ एक-चतुर्थांशच असतो. बाकी सगळे नुसता नीट अभ्यास करण्याच्या ओढाताणीतच अडकून पडतात; आणि साधारणपणे सहावीचे शिक्षक, हे मूळ कारण जाणून घेण्याच्या भानगडीतच पडत नाहीत. ते फक्त एवढंच म्हणत राहतात... 'ही मुलं नीट अभ्यास करत नाहीत.'

विचित्र विषयांचे जग...


मेडिसीन
संगीत
हस्तकला
आधुनिक गणित
भौतिक
पाकशास्त्र
बीजगणित
रसायनशास्त्र
पादांतर
भूगर्भ शास्त्र
कार्यविधान
नागरिक शास्त्र
चित्रकला
शिवण
अर्थशास्त्र
डेटा प्रोसेसिंग
निबंध लेखन
जीव-विज्ञान
साहित्य
फिलॉसॉफी
लेखन
शब्दावली
इतिहास
भूगोल
संस्कृत
प्राकृतिक विज्ञान
माणूस
मॅनेजमेंट
विधि

जे मुलाच्या समजुतीच्या कक्षेबाहेरही आहे आणि त्याचा लगेच कोणताच फायदा दिसून येत नाही.



सलग करून घेतल्या जाणाऱ्या कामाचा फायदा मुलांना स्वत:ला कळत नाही. ते हे काम केवळ यासाठी करतात, की 'शाळेत असंच होतं' किंवा त्यांना शिक्षा मिळण्याची भीती असते.

आणि कधी कधी मुलं जेव्हा आपला विरोध व्यक्त करण्याचं धाडस या प्रकारे करतात -
''व्याकरण बेक्कार आहे''
''गणिताचा उपयोग काय?''

तेव्हा प्रौढ पालक किंवा शिक्षक त्याचं उत्तर केवळ असंच देऊ शकतात -
''पुढे याचा उपयोग तुम्हाला कळेल.''
''जेव्हा तू मोठा होशील तेव्हा तुला आपोआप समजेल.''

...वास्तवापासून फारकत झालेलं



शाळेबाहेर घडणाऱ्या, जीवनाच्या विविध पैलूंना स्पर्श करणाऱ्या घटनांपासून शाळेतील मुलं अगदी अनभिज्ञ राहतात. पाठ्यक्रमात अंतर्भाव नसल्याने शिक्षक या घटना मुलांपर्यंत पोहोचविण्याचा आणि त्यामध्ये मुलांना रस वाटेल अशा प्रकारचा काही प्रयत्न करीत नाहीत.

पाठ्यपुस्तकातील अभ्यासाचा रोजच्या जीवनातील वास्तव किंवा व्यावहारिक गरजांशी काही संबंध असावा असे दिसत नाही. असा कोणताच वर्ग नसेल, की ज्यामध्ये लेखन हे संवादाचं माध्यम बनतं वा गणित हे प्रत्यक्षात समस्या सोडविण्याचं साधन होतं. यामुळे शिक्षण निरुपयोगी व कंटाळवाणं वाटू लागतं. भरीत भर म्हणजे, शाळेतील संभावित (खोटं-खोटं) वातावरण ताण निर्माण करतं.

मुलांकडून फॉर्म्युले आणि व्याख्यांचं पाठांतर करून घेण्याऐवजी सहजच हसत-खेळत सोप्या प्रयोगांच्या माध्यमातून विज्ञानातील मूलभूत सिद्धांत मुलांना शिकविण्याच्या काही अनुकरणीय प्रयत्नांनाही सरकारकडून कसलंच प्रोत्साहन मिळत नाही. मध्य प्रदेशात असा एक प्रयत्न झाला. शाळेतील मुलांना शेतात नेऊन त्यांच्या मनात कृषि-विज्ञानाबद्दल कुतूहल जागृत होईल असा प्रयत्न केला. मुलांनी स्वत:च शेतकऱ्यांशी बोलून; रब्बी आणि खरीप पिकं काय असतात, जमीन किती प्रकारची असते, शेतीच्या कोणकोणत्या पद्धती आहेत, खताचे काय फायदे-तोटे होतात इ. गोष्टी जाणून घेतल्या. अशा वातावरणात तल्लख झालेल्या तर्कबुद्धिमुळे या मुलांनी काही दिवसां-पूर्वी स्वत:च काही स्थानिक अंधश्रद्धांना आव्हान दिलं. पण अर्थपूर्ण शिक्षणाचा हा प्रयोग हाताच्या बोटावर मोजण्या-इतक्याच शाळांपुरता मर्यादित राहिला.

एका ताणरहित आणि सहभावनायुक्त वातावरणात शिक्षणाला विस्तृत, उपयोगी आणि मनाला आवडेल असं बनवणं हे सरकार किंवा सरकारी शिक्षणतज्ज्ञांच्या अजेंड्यावर केवळ 'दाखविण्यासाठी केलेली आकडेमोड' याच स्वरूपात आढळतं.


विषयांची विभागणी आणि महत्त्व पूर्वीपासूनच ठरलेलं आहे-

सध्याच्या शिकविण्याच्या पद्धतीत प्रत्येक विषयासाठी एक डबा निश्चित आहे - व्याकरणाचा डब्बा, भूगोलाचा डब्बा, इतिहासाचा डब्बा... डब्बेच डब्बे! शाळेत गरज पडेल तेव्हा मुलं हे डब्बे उघडतात; पण शाळेच्या बाहेर या डब्ब्यांचा उपयोग जवळजवळ नाहीच!

एवढंच नाही, या डब्ब्यांना त्यांच्या प्राधान्याप्रमाणे क्रमवारी दिली आहे. हे प्राधान्य, कोणत्या डब्ब्यांवर अधिक वेळ खर्च केला जातो किंवा कोणत्या डब्ब्याला मुलाच्या परीक्षेच्या दृष्टिकोनातून अधिक गरजेचं मानलं जातं, यावरून लक्षात येतं.

प्राथमिक शाळांमध्ये भाषेला एक खास महत्त्व दिलं जातं. चित्रकला, संगीत व शारीरिक हालचालींना अनावश्यक समजलं जातं. बौद्धिक कामाच्या पद्धतींमध्ये फक्त अवघड विचारांना प्राधान्य दिलं जातं. वास्तवाशी निगडीत असलेल्या पद्धती आणि प्रयोगांद्वारा, स्वत: करून शिकवण्याची प्रक्रिया कमी महत्त्वाची मानली जाते.





मोठ्यांनी चालविलेलं आश्चर्यकारक जग...


शेवटी हे शिक्षक म्हणजे आहेत तरी कोण?

शिक्षक मुलांचं भविष्य उज्ज्वल बनवणारे शक्तिशाली प्रेरक आहेत का? की असे मशीनमधले दुवे जे फक्त संस्था जिवंत ठेवण्याचं काम करतात?


सत्य तर असं आहे, की ते स्वत:पण तशाच साखळ्या आणि ताण-तणावांनी बांधलेले आहेत; ज्यात ते मुलांना बांधून ठेवतात.

या शिक्षकांना किती स्वातंत्र्य दिलं जातं?






सर्वसाधारणपणे शिक्षक प्रचलित शिक्षणपद्धतीला मानतात; आणि अशा तऱ्हेने ते या यंत्राचे अत्यंत महत्त्वाचे भाग आहेत.



3 ··· पालकांकडून

जे शिक्षण आणि समाजाला बांधणारा धागा आहेत आणि त्याच कारणामुळे शैक्षणिक व सामाजिक मूल्यांवर आपला अधिक प्रभाव पाडू शकतात;
पण हा प्रभाव परिवर्तन थोपविण्यासाठीच वापरण्यात येतो.

सर्वच पालकांच्या नियंत्रणाचं भय नाही.
जे समर्थ आहेत, वर्तमानपत्रात लिखाण करतात वा उत्तम वक्ते आहेत, त्यांच्यापासून मात्र भय आहे.




4 ··· अभ्यासक्रमाकडून

ज्यांना सगळेच नावं ठेवत असतात, असे निरर्थक आणि आतंक पसरवणारे अभ्यासक्रम शिक्षकांना शिकवणं भागच असतं...
कारण वर्षाच्या शेवटी परीक्षा त्यावरच घेतली जाते.



उंदराची कथा, मुलांची व्यथा

जर विद्यार्थी यशस्वी होणार हा दृढ विश्वास शिक्षकाच्या मनात असला तर मूल नक्कीच यशस्वी होईल. शिक्षकाच्या पक्षपाती समजुती आणि विचारांचा मुलांवर अमर्याद प्रभाव पडतो. वेगळ्या शब्दात आपण म्हणू शकतो, की 'चांगले' आणि 'वाईट' विद्यार्थी हे शिक्षकच बनवतात.



अमेरिकेतील एका मानसशास्त्राच्या प्राध्यापकांनी, रॉबर्ट रोजनथाल यांनी एकदा आपल्या विद्यार्थ्यांच्या दोन गटांना बोलावलं. त्यांनी प्रत्येक गटाला तीस उंदीर दिले आणि त्याबरोबर एक चक्रव्यूहाचं कोडंही दिलं. त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितलं, की काही आठवड्यांच्या मुदतीत त्यांनी उंदरांना त्या चक्रव्यूहातून बाहेर पडण्याचं कौशल्य शिकवावं. जाताना त्यांनी एका समूहाच्या कानात हळूच सांगितलं, की त्यांना दिलेल्या उंदरांचं दिशा ओळखण्याचं ज्ञान चांगल्या प्रकारे विकसित झालेलं आहे. दुसऱ्या गटाला त्यांनी हळूच सांगितलं, की अनुवंशिक कारणांमुळे त्यांना दिल्या गेलेल्या उंदरांच्या यशाबद्दल जास्त आशा बाळगू नये.

प्रत्यक्षात मात्र हा फरक फक्त विद्यार्थ्यांच्या डोक्यात होता, कारण सगळे उंदीर प्रत्येक बाबतीत अगदी एकसारखे होते.

ट्रेनिंगची मुदत संपल्यावर प्राध्यापकाच्या हे निदर्शनास आलं, की 'चांगल्या' ठरविल्या गेलेल्या उंदरांनी प्रत्यक्षातही चांगले यश संपादले आणि 'वाईट' ठरविले गेलेले उंदीर आपल्या जागेवरून हललेही नाहीत.

या निकालामुळे प्रेरित होऊन रोजनथाल यांनी हाच प्रयोग एका शाळेत करण्याचं ठरवलं. मे १९६४ मध्ये रोजनथाल आणि त्यांची टीम दक्षिण सॅनफ्रान्सिस्कोमधील एका प्राथमिक शाळेत गेली. ह्या भागातील वस्ती गरिबांची होती; त्यांना थोडी मजुरी मिळत होती. येथे मेक्सिको, पोर्टोरिको इ. देशांमधून आलेले लोक सरकारी अनुदानावर आपली उपजीविका चालवित होते. शाळेतील बहुतेक मुलं गरीब होती.

संशोधकांच्या या टीमने शिक्षकांना खोटंच सांगितलं. त्यांनी सांगितलं, की ते हावर्ड विश्वविद्यालयातून आले आहेत आणि हे संशोधन ते नॅशनल सायन्स फाऊंडेशनसाठी करीत आहेत. एवढी मोठमोठी नावं ऐकल्यावर शिक्षकांनी त्यांना मुक्त प्रवेश दिला. ज्या मुलांमध्ये प्रगती करण्याची एक वेगळीच क्षमता होती, अशा मुलांचा शोध घेण्यासाठी, विद्यार्थ्यांची एक नवीन पद्धतीची चाचणी घेण्यात आली.

प्रत्यक्षात हे सर्व खोटं होतं. मुलांची मानसिक क्षमता मोजण्यासाठी त्यांना एक सामान्य आय.क्यू. टेस्ट दिली होती. त्यानंतर प्रत्येक वर्गातील २० टक्के मुलांची, कोणत्याही मापदंडाशिवाय लॉटरीच्या आधारावर निवड करण्यात आली. 'हावर्डच्या संशोधनावर आधारित निष्कर्षांमध्ये जर आपल्याला रस असेल...' अशा तऱ्हेने शिक्षकांची मानसिकता तयार केल्यावर संशोधकांची टीम पुढच्या निष्कर्षांची वाट पाहात होती. चार महिन्यानंतर आणखी एक टेस्ट, एक वर्षानंतर दुसरी आणि शेवटची टेस्ट दोन वर्षांनंतर देण्यात आली.


या टेस्टचे निकाल पाहिल्यावर रोजनथाल आणि त्यांची टीम एकदम आश्चर्यचकित झाली. ज्या मुलांना कृत्रिमरित्या चांगली प्रगती करण्यायोग्य समजलं गेलं होतं, त्यांनी इतर मुलांच्या तुलनेत कितीतरी अधिक वेगाने प्रगती केली होती. अशा डझनभर उदाहरणांतून आपण फक्त दोनच घेऊया. जोज नावाच्या मेक्सिकन मुलाला 'प्रतिभावान' म्हणून जाहीर करण्याआधी, त्याचा आय.क्यू. केवळ ६१ होता. एका वर्षानंतर त्याचा आय.क्यू. १०६ झाला. एका वर्षापूर्वी जो मुलगा मागे पडला होता, त्याला एक कृत्रिम, नवं लेबल लागल्यानंतर तो खरोखरच बुद्धिमान आणि गुणी बनला होता. मारिया नावाच्या एका मेक्सिकन मुलीमध्येही अशाच प्रकारचं अभूतपूर्व परिवर्तन झालं. तिचा आय.क्यू. ८८ पासून वाढून १२८ झाला. या रोचक उदाहरणांबद्दल शिक्षकांचं असं म्हणणं होतं, की या मुलांमध्ये 'कुतूहल', 'उत्स्फूर्तता' आणि 'परिस्थितीनुसार बदलण्याची क्षमता' होती.

ज्या मुलांनी वेगानं प्रगती केली, त्या सर्वांची प्रगती एकसारखी नव्हती. सर्वांत जास्त प्रगतीची उडी सर्वांत छोट्या वयाच्या मुलांनी मारलेली दिसली. याचं कारण कदाचित हेच असावं, की छोट्या मुलांवर आपल्या शिक्षकांचा सर्वाधिक प्रभाव होता.

यावरून हे स्पष्ट होतं, की शिक्षकांच्या पक्षपाती समजुती आणि विचारांचा मुलांवर अपरिमित प्रभाव पडतो. आपण निराळ्या शब्दात हे म्हणू शकतो, की चांगले आणि वाईट विद्यार्थी शिक्षकच बनवतो.


टीमच्या हे ध्यानात आलं, की चांगल्या ठरविल्या गेलेल्या मुलांबरोबर शिक्षकांनी जास्त गप्पा मारल्या आणि बहुतेक हेच त्यांच्या प्रगतीचं खरं कारण असावं; पण शेवटी टीमला हा निष्कर्ष नाकारावा लागला. इतर चाचण्यांवरून हे लक्षात आलं, की या मुलांनी फक्त भाषेतच नव्हे, तर तार्किक बुद्धिमत्तेमध्येपण प्राविण्य मिळविलं होतं. एका कृत्रिम लेबलमुळे 'मागे पडलेली' मुलं 'हुशार' झाली होती.

याचं तात्पर्य हेच आहे, की जर शिक्षकाला विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल दृढ विश्वास असेल तर मूल नक्कीच यशस्वी होईल. शिक्षणातील ही सुधारणा कदाचित सर्वांत स्वस्त असेल; पण हे अमलात आणणं तेवढंच कठीण काम असेल.



बस! खूप झालं! मला दिसतंय की भरपूर समस्या आहेत.
'हं, पण अजून काम शिल्लक आहे.'


तुम्हाला हे तर मान्य असेल ना, की अशा तऱ्हेच्या समस्या सर्वांनाच येतात. त्यामुळे जे यशस्वीरित्या बाहेर पडतात ते जास्त हुशार असतात हे उघड आहे. ज्यांना बुद्धी थोडी कमी आहे किंवा ज्यांना मानसशास्त्रीय समस्या आहेत...
हं! हं! थांबा! थांबा!... एवढी घाई करू नका! मला हे मान्य आहे, की व्यक्तीव्यक्तीतील भिन्नतेमुळे काही परिणाम होत असेल, पण या भिन्नतेवरून सगळ्याच गोष्टी आपल्याला समजत नाहीत! नाहीतर आपण पुन्हा पहिल्या मुद्यावर जाऊन पोहोचू, की श्रीमंत घरातील मुलं अधिक हुशार असतात, यशस्वी होतात... नाही रे बाबा! हे सगळं याहून जास्तच गुंतागुंतीचं आहे.
अरे! पण हे तर खरं आहे ना, की शाळेत सगळ्यांशी एकाच प्रकारे वागलं जातं?
हेच तर या समस्येचं मूळ कारण आहे! एका श्रीमंत घरातील आणि एका गरीब घरातील मुलामध्ये फार मोठ्ठं अंतर असतं!...
मुलं हे अंतर आपल्या दप्तरात भरून शाळेत घेऊन येतात. अशा परिस्थितीत सर्वांशी सारखं वागलं तर हे अंतर एक तर आहे तसंच राहतं, किंबहुना त्यामुळे अधिकच वाढतं.
पण मुळातच हा फरक येतो कसा?

शाळा सामाजिक व सांस्कृतिक भिन्नतेकडे दुर्लक्ष करते



१. राहणीतील भिन्नता



मुलांच्या यशातील सिंहाचा वाटा - घरातील परिस्थिती, राहण्याची जागा, आजूबाजूची माणसं आणि आपल्या मुलांच्या अभ्यासासाठी पालक जो वेळ देतात तो वेळ - या सर्व बाबींकडे जातो. विशेष करून, मुलांना जेव्हा दोन वेगळ्या वाटांमधून एकीची निवड करायची असते, तेव्हा घरातली आर्थिक परिस्थिती निर्णायक ठरू शकते.






२. सांस्कृतिक पार्श्वभूमीतील भिन्नता

३. शाळेच्या बाहेरील आयुष्याचे अनुभव

मुलं आणि तरुणांच्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग शाळेच्या बाहेर मिळालेल्या अनुभवांचा बनलेला असतो. वेगवेगळ्या स्तरातील मुलांचे हे अनुभवपण वेगळे असतात. सर्वसाधारणपणे संपन्न स्तरातील मुलांचे अनुभव शालेय शिक्षणाला पुरकच असतात आणि याच कारणामुळे त्यांच्या शिक्षणात या अनुभवांचा हातभार लागतो.

क्रमिक पुस्तकांव्यतिरिक्त इतर नियतकालिकं, वर्तमानपत्रं आणि इतर देशातील साहित्याचं वाचन, सहलींना जाणं, नाटक, चित्रकला, संगीताशी संपर्क आणि सामाजिक स्तराला सुयोग्य असे टी.व्ही.चे कार्यक्रम - या सगळ्यांची शाळेत यश मिळवून देण्यात मदत होते.

याउलट, कष्टकऱ्यांच्या किंवा शेतकऱ्यांच्या मुलांच्या अनुभवाचं, मग ते वरील अनुभवांइतकेच महत्त्वाचे असले तरीही, शालेय शिक्षणाशी काही देणं-घेणं नसतं.





४. शाळेकडे पाहण्याचा पालकांच्या दृष्टिकोनातील फरक


शिक्षित पालकांची शालेय व्यवस्थेशी ओळख असते. भारतातील शाळांमध्ये भरती होणाऱ्या मुलांमधील एक मोठा भाग अशा कुटुंबातून येतो, ज्यांनी कधी शाळेचं तोंडही पाहिलेलं नाही. म्हणजे त्यांचे पालक कधी शाळेत गेले नाहीत आणि याच कारणामुळे त्यांची शालेय व्यवस्थेशी तोंडओळखही झालेली नाही.

शिक्षित पालकांच्या आपल्या मुलांकडून अपेक्षाही खूप असतात- उदा. डॉक्टर, इंजिनियर किंवा अशाच दुसऱ्या कुठल्या व्यवसायासाठी, अभ्यास करून पात्रता मिळवणे- जर यांची मुलं अभ्यासात मागे पडली तर हे पालक सारे प्रयत्न करतात... जसं शिक्षकांना भेटणं, बोलणं, घरी मदत करणं, ट्यूशन लावणं किंवा गरज पडल्यास दुसऱ्या एखाद्या चांगल्या शाळेत बदली करून घेणं... ज्यायोगे त्या परिस्थितीत सुधारणा होईल.

हे खरं आहे, की गरीब आणि अशिक्षित पालक शाळेला सामाजिक प्रगतीचं एक साधन मानतात; पण सर्वसाधारणपणे ते आपल्या मुलांच्या शिक्षणात एवढा रस नाही घेऊ शकत, शाळेच्या निर्णयावर प्रश्न विचारण्याच्या योग्यतेचं ते स्वत:ला समजत नाहीत. याच कारणामुळे ते आपल्या मुलांचं अपयश सहजतेनं स्वीकारतात.

इटलीतील एका उच्च माध्यमिक शाळेतील प्राचार्यांनी मुलांना एका पत्रात असं लिहिलं, "आपली घटना सर्वांसाठी एकसारखा मानसिक विकास किंवा एकसारखी शैक्षणिक आवड याची गॅरंटी देऊ शकत नाही." पण हीच गोष्ट ते आपल्या स्वत:च्या मुलाबद्दल म्हणू शकतील का? ते त्याला शालेय शिक्षण पूर्ण करण्याचं बंधन घालणारच ना? शाळा सोडून मजुरी करण्यासाठी तर ते त्याला पाठवणार नाहीत ना? संपन्न घरातील मुलंपण अभ्यासात मागे राहून, समाजकंटक बनू शकतात; पण त्यांचे पालक त्यांना समस्या व संकटांमधून बाहेर काढतातच.





यावरून मला जे समजलं ते असं, की
काही मुलं कमनशिबी असतात - अपुरी घरगुती साधनं,
संस्कृतीचा अभाव आणि बोलण्या-चालण्यात कमतरता -
या कारणांमुळे! म्हणजे मग हे साहजिकच आहे,
की ती शाळेत अपयशी ठरतात.
नाही मित्रा, तुला नीट कळलेलं
नाही मी काय म्हणतोय ते. तुमचं
म्हणणं आहे, की गरिबांच्या
मुलांची सांस्कृतिक पातळी ही
खालच्या स्तरावर आहे आणि
त्यांची बुद्धी व बोलणं-चालणं
(वळण) इतर मुलांच्या तुलनेत
वाईट आहे.
प्रथम तुम्ही त्यांच्या अपयशाचं कारण त्यांची 'वैयक्तिक कमतरता' हे दिलं होतंत - जसं मंदबुद्धी,
मानसशास्त्रीय समस्या, नीतिमूल्यांचा अभाव इत्यादी, इत्यादी. आणि आता तुम्ही हेच तुमचं मत त्यांच्या संपूर्ण वर्गावर
ट्रान्सफर करता आहात - म्हणजे तुम्हाला असं म्हणायचं आहे, की अपयशाची कारणं त्यांच्या सामाजिक स्तरातच
दडलेली आहेत - बोलण्या-चालण्यांमध्ये कमीपणा, कठीण विचार-विनिमयाचा अभाव आणि कोणास ठाऊक काय काय!

दोन्ही विचारांमध्ये, अपयशाची जबाबदारी एक तर मुलाची आहे किंवा कुटुंबाची! तुमच्या मते शाळा किंवा समाजाचा या बाबतीत काहीही संबंध नाही.




हे विचार मूळ गोष्टींकडे दुर्लक्ष करतात. मूळ कारण असं आहे, की शाळा केवळ एकाच प्रकारची संस्कृती लादते, यामुळे ज्यांची संस्कृती थोडी वेगळी आहे अशी मुलं इतरांपेक्षा मागे पडतात!

कमतरता फक्त एकाच कारणामुळे आहे – एक लादलेली, वरचष्मा असलेली संस्कृती हेच ते कारण.




...
यंत्राशिवाय आणखीपण काही आहे. शाळेत फक्त ज्ञानच मिळतं असं नाही. व्यवहार, मूल्यं आणि सामाजिक मापदंड - हे सगळंही मिळतं.
आहे!
ऑर्डर, वेळेवर काम, स्वच्छता, शिस्त, दुसऱ्याचं ऐकणं, मैत्री - हेच तर प्राथमिक शाळा मुलांना शिकविते! हे सारं काय चुकीचं आहे?
ही सारी तर तथाकथित मूल्यं आहेत.
पण अजूनही काही मूल्यं आहेत, जी रोज रोज, दरवर्षी शिकवताना आपोआप मुलांच्या वागण्यात उतरतात.
उदाहरणार्थ?


१. स्वार्थीपणा आणि स्पर्धा



२. स्वत:मध्ये कमतरता असल्याची भावना



३. अधिकार आणि आज्ञांचे चूपचाप पालन करणे



४. विरोधाभासाला घाबरणं





पाहिलंत?... हे सगळं छान लपलेलं होतं... तरीही
बघू मला!
अरे बाप रे! यानं तर खूपच इजा होऊ शकते.
हो, यानं खूपच त्रास होऊ शकतो. कल्पनाशक्ती आणि सृजनशक्तीला हा दडपू शकतो, वाटणी करू शकतो... एकटेपणा निर्माण करू शकतो आणि परावलंबित्व निर्माण करू शकतो.

शाळा तर आपली भाषाच नीट शिकवत नाही. इतर भाषांबद्दल काय बोलायचं! शाळा ना आम्हांला गायला शिकवते ना हाता-पायांचा योग्य उपयोग! आरोग्याला लाभदायक अशा खाण्याबद्दल किंवा संस्थांच्या जंगलातून यशस्वीरित्या मार्ग काढण्याच्या पद्धतीबद्दल शाळा काहीच सांगत नाही. एखाद्या पेशंट किंवा लहान बाळाच्या देखभालीबद्दल शाळा काहीच सांगत नाही.

जेव्हा जास्त लोकांना स्वत:ला गायन-वादन येत नसतं तेव्हा ते लाखो रेकॉर्ड्स आणि कॅसेट्स विकत घेतात. जेव्हा त्यांना संतुलित आहाराबद्दल काहीही माहिती नसतं तेव्हा ते डॉक्टर किंवा औषध कंपन्यांना पैसे देतात. त्यांना जसा आपला नळ वा रेडिओ दुरुस्त करता येत नाही; तसाच त्यांना साधी जखम किंवा खोकला, औषधाशिवाय बरा नाही करता येत...

हे एवढ्यासाठी, की
शाळेचं एक
अस्वीकृत ध्येय असं
आहे, की कामगार
आणि ग्राहक निर्माण
करावे... किंवा
वेगवेगळ्या सरकारी
कामांसाठी
(वाणिज्य, उद्योग
इत्यादी) नोकर
निर्माण करावे.





तर मग... याचा अर्थ असा, की सर्वांना समान संधी देईल अशी ज्या शाळेकडून अपेक्षा होती, ती वास्तवात त्याच सामाजिक विषमतेला स्थैर्य देते का, जी सामाजिक वर्गात आहे?

ज्या शाळेकडून आम्हांला अशी आशा होती की ती उद्धार करेल आणि मुक्ती देईल, तीच प्रत्यक्षात परावलंबित्व वाढीला लावते आहे.



विद्यार्थी

त्यांना काही

अधिकार आहेत

का, की ज्यांच्या

सहाय्याने ते काही

परिवर्तन

आणू शकतील?

पालक

ज्या व्यवस्थेमार्फत आपल्या मुलांना सर्टीफिकेट मिळतं, त्याच व्यवस्थेला जर आव्हान दिलं तर आपल्या मुलांचं काय होणार?- या भीतीनं पालक गप्प राहणारच ना? ज्यांना या व्यवस्थेचा सर्वांत कमी फायदा मिळतो - शेतकरी व कामगार वर्ग - आणि ज्यांच्याकडून प्रतिक्रियेची खरं तर अधिक अपेक्षा असायला हवी - ते एका फसव्या स्पष्टीकरणाचे बळी झालेले असतात. हे स्पष्टीकरण समाजातील 'शहाणी' माणसं त्यांना देतात - 'तुम्हा लोकांची मुलं आळशी आणि मतिमंद आहेत.'

त्यांच्यामधीलही जे कुणी एकटे-दुकटे यशस्वी होतात, त्यांच्यासमोर खास आकडेवारी मांडून हे सांगितलं जातं, की शिक्षणामुळे तुमची केवढी प्रगती होतेय आणि त्यांना फसवलं जातं.

शिक्षक

आहे त्या व्यवस्थेचा


स्वीकार करणं किंवा

राजीनामा देणं


या व्यतिरिक्त

काही पर्याय

त्यांच्यासमोर आहेत का?



शाळा
हा
सामाजिक
यंत्रामधील
एक
भाग
आहे.





एक भाग आहे?



आम्ही असं म्हणू शकतो, की प्रत्येक समाजात नेहमीच शिक्षणाचं उद्दिष्ट हेच होतं, की नव्या पिढीला प्रौढ आयुष्यासाठी तयार करणं.

पण त्याचबरोबर ही गोष्टही लक्षात घेतली पाहिजे, की कोणत्या प्रकारचं ज्ञान व माहिती कशा तऱ्हेनं दिली गेली पाहिजे आणि कोणतीही मूल्ये आणि व्यवहार हे शिक्षणाच्या माध्यमातून पुढे गेले पाहिजेत, हे समाजाच्या उत्पादनाच्या पद्धतीवर अवलंबून असतं.





आजकालच्या औद्योगिक समाजात कामं आणि सामाजिक जीवनाचं विभाजन अशा पद्धतीने झालं आहे, की एका बुद्धिजीवी वर्गाच्या हातात व्यवस्था, तसंच वैज्ञानिक आणि तांत्रिक कंट्रोल राहील आणि बाकीची कामं इतर लोक करतील. अशा प्रकारे कामाच्या विभाजनात सामाजिक विभाजन हे अंतर्भूत आहे. समाजाच्या शिखरावर काहीच उच्च-शिक्षित आणि उच्च तंत्रज्ञांची गरज आहे आणि बाकीच्या लोकांनी फॅक्टरीज्, दुकानं, कार्यालयं किंवा शेतात जीव तोडून कामं करावी, कारण त्यासाठी उच्च शिक्षणाची काही गरज नसते.

याच विचाराच्या आधारावर शाळापण पास-नापास ठरवण्याच्या पद्धतीनं समाजातील अंतर्गत विभाजनाला मदत करते. त्यामुळे **एका बाजूला** आहेत विश्वविद्यालये आणि तंत्रज्ञान संस्था, जिथे उच्च शिक्षण देऊन विशेषज्ञ तयार केले जातात व ते नंतर इंजिनिअर, योजना करणारे, प्राध्यापक व डॉक्टर बनतात. यांची विचारसरणीच पुढे इतर लोकांचं भविष्य ठरविते. **दुसऱ्या बाजूला** आहेत असे व्यवसाय, जे शिक्षण पद्धतीतून बाजूला काढले गेलेले अयशस्वी लोक पत्करतात.

एका दृष्टीने पाहिलं तर या असमान समाजाला शिक्षणपद्धतीत नापास झालेल्या व्यक्तींचीपण तेवढीच गरज आहे, जेवढी उच्च शिक्षण घेतलेल्या लोकांची - शेवटी ही 'खालच्या' दर्जाची कामं कोण करणार?

आजकाल आपण ज्याला 'शिक्षण' म्हणतो ते एक प्रॉडक्ट आहे, ज्याचं उत्पादन शाळा नावाच्या संस्थेमार्फत होतं. जितकं अधिक शिक्षण कोणी एक व्यक्ती घेईल, तितकंच त्याचं भविष्य सुरक्षित बनेल. तसंच ज्ञानाच्या पूंजीवादात त्याचा दर्जा खूपच उंचावेल. अशा तऱ्हेने जीवनाच्या पिरॅमिडमध्ये शिक्षण एक नवीन वर्ग बनवतं; आणि जे अधिक शिक्षण घेतात ते ही गोष्ट सिद्ध करतात, की त्यांचाच समाजाला खूप फायदा आहे.

- इवान इलिच



जेव्हा थोड्याच लोकांना पदवी किंवा पदविका मिळते आणि इतरांना नाही, जेव्हा संपन्न लोकांची संस्कृती कष्टकऱ्यांच्या संस्कृतीपेक्षा अधिक महत्त्वाची मानली जाते आणि जेव्हा निवड करण्याच्या प्रक्रियेला आवश्यक आणि अनिवार्य मानून तेच योग्य असल्याचं सिद्ध केलं जातं, तेव्हा ही गोष्ट ओघानेच मान्य होते, की शाळापद्धतीने समाजाचं दोन भागात विभाजन व्हावं. विचारवंत, आदेश देणारे आणि प्रशासन करणारे यांचा एक छोटा गट असावा आणि एक विशाल समूह असावा, जो आदेशांचं पालन करेल, ऐकेल आणि आज्ञाधारक असेल.

या दोन गटातील विभाजनाच्या प्रक्रियेत शाळेची एक विशेष भूमिका असते. शाळा न कंटाळता एकच धडा शिकवत असते तो म्हणजे उच्चशिक्षित व्यक्तीच फक्त विशेषज्ञ होऊ शकते; ज्ञानामुळेच समाजात दबदबा निर्माण होतो आणि जितकं अधिक शिक्षण एखादा घेईल तितकाच जास्त त्याचा दबदबा असेल.

अशा परिस्थितीत ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे, की जे लोक उच्च शिक्षणात पाऊलही टाकू शकत नाहीत, त्यांच्यासाठी शाळेचं काय महत्त्व आहे? कष्टांच्या जगात प्रवेश करण्यापूर्वी शाळेकडून त्यांना काही उपयोगी गोष्टी शिकायला मिळतात का?

त्यांना हे समजतं, की शाळेत जे काही शिकवलं जातं ते मित्रांबरोबर वाटून घेता येत नाही. कारण या शिक्षणाचा त्यांच्या रोजच्या जीवनात सुधारणा घडवून आणण्याशी काही संबंध नाही. शालेय शिक्षणाचा जर काही फायदा होत असेल तर तो हा, की मजुरीच्या बाजारात याच्या जोरावर आपल्या कामासाठी थोडेबहुत पैसे मिळवता येऊ शकतात.

आपली मजुरी, जी आज एक उपभोगाची वस्तू बनली आहे, विकून आपण अनेक प्रकारच्या विशेषज्ञांची सेवा विकत घेऊ शकतो. यामध्ये कितीतरी साध्या आणि गरजेच्या सेवांचा समावेश होतो - उदा. आरोग्य, सकस आहार, माहिती, संपर्क, प्रवास, खेळ इ.

शालेय शिक्षणातून
परावलंबित्व आणि
असमानतेचा अनुभव
आला की आपण
स्वत:ची काम करण्याची
शक्ती गमावून बसतो.

आणि गमावतो एकत्र
येऊन काही नवीन
निर्माण करण्याची
क्षमता, एकत्र राहण्याची
पद्धत! आपण गमावतो
वास्तवाकडे एका
परीक्षणाच्या पद्धतीतून
पाहण्याची क्षमता आणि
बाजू घेण्याची ताकद!


आणि अशा रीतीने
आपण गमावतो पर्याय
शोधण्याचा दृष्टिकोन!





जर...
1
सगळंच
ठीक नाहीये...
2
सगळीकडे
गडबड
आहे...
3
तर सगळंच
बदलायला
हवं.
4
पण हे
अशक्य आहे.
5
ही समस्या
माझ्या
मानाने
फारच मोठी
आहे
6
वाचवा!!
7

तरीही बदल तर होतातच...




भविष्य


हं! काहीतरी गडबड तर दिसतेय...
न बदलण्यासारखी परिस्थिती नाहीय...
बदल तर होतच राहतो, पण कोणत्या दिशेने?
शाळा बदलल्या आहेत. काही काट-छाट झाली आहे.
असं कोणाला वाटत नाही, की सगळंच खिडकीतून बाहेर फेकून द्यायला पाहिजे.
जे बरोबर आहे ते तसंच टिकवलं पाहिजे.
जे बरोबर नाही त्याचा आढावा घ्यायला हवा आणि पर्याय सुचवायला हवे...
काय व्हायला नको ते आम्हाला नक्की माहीत आहे; पण काय व्हायला हवं ते मात्र स्पष्ट नाहीय...
बदल एका रात्रीतून नाही होत...
अरे बाबा! रेडिमेड पर्याय नसतात.


एक गोष्ट तर अगदी उघड आहे. आपल्याला जर बदल हवा असेल, तर तो आपणच करायला हवा.
अरे बाबा! विचार-विनिमय, प्रयोग आणि योजनांची गरज आहे.
जे पर्याय आपण सुचवू त्यांचा हजारोंच्या जीवनावर परिणाम होऊ शकतो...
विश्लेषणाच्या प्रक्रियेत सर्वांना सामील करून घेतलं पाहिजे.
काम तर आपल्याला मिळूनच करायला हवं.
आपण सगळे जर आपापसातच बोलत राहिलो तर आपण काहीच करू शकणार नाही.
काही प्रयत्न आधीच झाले आहेत, पण सामान्य लोकांना हे माहीतच नाहीये...
जी मूल्यं सुचविली आहेत ती तर पहिल्यापासूनच चालत आली आहेत.